॥ सा विद्या या विमुक्तये ॥

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णुपूरी, नांदेड . 431606 (महाराष्ट्र)

SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded – 431606 (Maharashtra)

Establishment on 17th September 1994 – Recognized by theUGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade

**ACADEMIC (AFFILIATION) SECTION**

**Phone: (02492) 229242/43 Fax : (02462) 229574 Website: srtmun.ac.in e-mail: affi.srtmun@gmail.com**

विद्यापीठातील सर्व संलग्नीत महाविद्यालये/ संस्था मध्ये Integrated University Management System(IUMS) ही प्रणाली लागु करण्यासाठी core implementation Team गठीत करण्याबाबत.

संदर्भ:– संकिर्ण–२०१६/प्र.क्र.५६७/१६/विशि–३, दि. २१ एप्रिल, २०१८

::परिपत्रक::

मा. प्राचार्य, सर्व संलग्नीत महाविद्यालये प्रस्तुत विद्यापीठ यांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, संदर्भीय शासन निर्णयाद्वारे महाराष्ट्र शासनाने मुद्दा क्र. २ मधील १ व २ नूसार प्रत्येक महाविद्यालयामध्ये Integrated University Management System(IUMS) या प्रणाली अंतर्गत core implementation Team गठीत करण्याबाबत आदेशीत केलेले आहे. (सोबत संदर्भीय शासन निर्णय)

तेव्हा सर्व संलग्नीत महाविद्यालयाची core implementation Team गठित करावी व गठित केलेल्या समितीची माहिती iumscit.srtmun@gmail.com या ईमेलवर पाठवावी. तसेच शासन निर्णयात दिलेल्या नियमांची वेळोवेळी अंमलबजावणी करण्यात यावी.

तरी संदर्भीय शासन निर्णयाचे अवलोकन करुन पुढील योग्य ती कार्यवाही तात्काळ करण्यात यावी.

"ज्ञानतीर्थ" परीसर )(
विष्णुपुरी, नांदेड )(
जा. क्र.शैक्षणिक–३/२०१७–२०१८/ )(
दिनांक : ०७/०६/२०१८ )(
)(

उपकुलसचिव
शैक्षणिक (संलग्निकरण) विभाग

प्रत माहीतीस्तव :

१. मा. संचालक, परिक्षा व मुल्यमापन विभाग, प्रस्तुत विद्यापीठ.

२. मा. प्राचार्य सर्व संलग्नित महाविद्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.

३. श्री. अजय दर्शनकार, सिस्टीम एक्सपर्ट, युजीसी कक्ष, प्रस्तुत विद्यापीठ.

. सिस्टीम एक्सपर्ट, युजीसी कक्ष, प्रस्तुत विद्यापीठ यांना विद्यापीठ वेबसाईटवर उपलब्ध करण्यासाठी.

C:\kp\circular.doc

राज्यातील सर्व अकृषी सार्वजनिक विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालये/संस्था इत्यादीमध्ये Integrated University Management System (IUMS) ही प्रणाली लागू करण्यासाठी Core Implementation Team गठीत करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**

**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**

**शासन परिपत्रक क्रमांक : संकीर्ण-२०१६/प्र. क्र. ५६७/१६/विशि-३,**

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

दिनांक :- २१ एप्रिल, २०१८

वाचा :- १) शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र. संकीर्ण-२०१६/प्र. क्र. ५६७/१६/विशि-३, दि.१८ जानेवारी, २०१७

२) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन (मा.तं) विभाग, क्र.GAD-मातंस/०६१/१/२०१७/DIT (MH), दि.३ एप्रिल, २०१८

**शासन परिपत्रक :-**

Integrated University management System (IUMS) ही प्रणाली राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठांना लागू करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. या प्रकल्पांतर्गत राज्यातील सर्व अकृषी सार्वजनिक विद्यापीठांना (IUMS) प्रकल्पाअंतर्गत, येत्या वर्षांमध्ये विद्यार्थ्यांना, फॅकल्टी, विद्यापीठ अधिकारी, कर्मचारी, संलग्नित महाविद्यालये आणि इतर हितधारक इत्यादींना एक सहज अनुभव प्रदान करण्यासाठी विद्यापीठे मजबूत आयसीटी बॅकबोनसह सुसज्ज होतील.

त्यानुषंगाने संदर्भ क्र.२ येथील दि.३ एप्रिल, २०१८ च्या परिपत्रकाव्दारे अपर मुख्य सचिव (उच्च व तंत्रशिक्षण) यांच्या अध्यक्षतेखाली IUMS Project Steering Committee (PSC) तसेच प्रधान सचिव (मा.तं.) यांच्या अध्यक्षतेखाली Project Monitoring Committee (PMC) स्थापन करण्याबाबत आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. सामान्य प्रशासन (मा. तं) विभागाने या प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी राज्यातील अकृषी सार्वजनिक विद्यापीठांशी संलग्न असलेल्या सर्व महाविद्यालयांमध्ये तसेच सर्व सार्वजनिक विद्यापीठांमध्ये Core Implementation Team गठीत करण्याचे प्रस्तावित केले आहे.

२. त्यानुषंगाने, खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत. :-

१) राज्यातील सार्वजनिक विद्यापीठाशी संलग्न प्रत्येक महाविद्यालयामध्ये खालील प्रमाणे Core Implementation Team गठीत करण्यात यावी.

| | |
|---|---|
| Principal/Vice Principal of Affiliated College | Head |
| Administration Cell | 1 Representative |
| IT Cell | 2 Representatives |
| Lecturer | 2 Representatives |
| Students | 2 Representatives |

२) या समितीची किमान हा प्रकल्प सुरु होईपर्यंत (Go- Live phase) प्रतिदिन बैठक घेणे आवश्यक राहील. या समितीची कार्ये सोबत जोडलेल्या प्रपत्र "अ" प्रमाणे राहतील.

३) त्याचप्रमाणे, राज्यातील सर्व सार्वजनिक विद्यापीठामध्ये देखील खालीलप्रमाणे Core Implementation Team गठीत करण्यात यावी.

| | |
|---|---|
| Registrar | Head |
| University Departments | |
| Finance and Accounts | 1 Representative |
| Establishment | |
| Administration | |
| Thesis | |
| Affiliation | |
| IT Cell | |
| Faculty Appointment Unit | |
| Admission | |
| Examination | |
| Professor | 2 Representatives |
| Students | 2 Representatives |

४) या समितीची किमान हा प्रकल्प सुरु होईपर्यंत (Go- Live phase) प्रत्येक आठवड्यात दोनवेळेस बैठक घेणे आवश्यक राहील. या समितीची कार्ये सोबत जोडलेल्या प्रपत्र "ब" प्रमाणे राहतील.

३. वर नमूद केलेल्या दोन्ही (महाविद्यालयीन/विद्यापीठीय) स्तरावरील समित्या गठीत करतांना त्यासाठी प्रतिनिधीत्व देण्याचे निश्चित केलेल्या प्रत्येक घटकातून वैयक्तितरित्या नामनिर्देशन करण्यात यावे. महाविद्यालयीन स्तरावर गठीत समित्यांबाबतची माहिती प्रत्येक सार्वजनिक विद्यापीठाने त्यांच्याकडे जतन करुन ठेवावी. याबाबत प्रत्येक सार्वजनिक विद्यापीठाने त्यांच्या स्तरावर सर्व संलग्नित महाविद्यालयांना आवश्यक त्या सूचना प्रसारित कराव्यात.

४. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक २०१८०४२११७०४००४८०८ असा आहे. हे शासन परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Sanjay A. Dharurkar

Digitally signed by Sanjay A. Dharurkar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher and Technical Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=637145fd393d6d5c713e94e6da7bc6bee23011448b7fc64d138630b9c76ae7a2, cn=Sanjay A. Dharurkar
Date: 2018.04.21 17:10:51 +05'30'

**( संजय औ. धारुरकर )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) मा. कुलपती यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२) कुलगुरु, सर्व सार्वजनिक अकृषी विद्यापीठे.
३) संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
४) संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
५) कुलसचिव, सर्व सार्वजनिक अकृषी विद्यापीठे.

**प्रत माहितीसाठी -**

१) मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) मा. राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) सामान्य प्रशासन (मा.तं) विभाग, मंत्रालय, मुंबई.

**शासन परिपत्रक, उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र. संकीर्ण-२०१६/प्र. क्र. ५६७/१६/विशि-३, दि. २१ एप्रिल, २०१८ सोबतचे प्रपत्र "अ"**

The broad functions of the Core Implementation Team – College include the following, but not limited to as given below -

1. Provide overall leadership, vision and direction for the implementation of the Project across respective college.
2. Provide guidance for successful implementation of the project.
3. Creating a supporting environment for the success of the project with focus on change management and capacity building plans of various stakeholders.
4. To ensure that all the identified authorized users are trained on the system by the onsite support team deployed by the System Integrator.
5. Conduct regular meetings with the selected end users for issue resolution, if any.
6. To update the respective parent university about the status / progress of implementation (on a weekly basis), including technical issues faced by the users.
7. Act as a Liaison between the System Integrator and the college users for resolution of any technical issues that may arise from time to time.
8. Facilitate data sharing between college and Maha IT / System Integrator's representative.
9. Conduct periodic reviews with the onsite support team regarding the progress of implementation.

**शासन परिपत्रक, उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र. संकीर्ण-२०१६/प्र. क्र.५६७/१६/विशि-३,
दि.२१ एप्रिल, २०१८ सोबतचे प्रपत्र "ब"**

Functions – The broad functions of the Core Implementation Team – University include the following, but not limited to -

1. Provide overall leadership, vision and direction for the implementation of the Project across respective University.
2. Provide guidance for successful implementation of the project.
3. Creating a supporting environment for the success of the project with focus on change management and capacity building plans of various stakeholders.
4. To ensure that all the identified authorized users are trained on the system by the onsite support team deployed by the System Integrator.
5. Conduct regular meetings with the selected end users for issue resolution, if any.
6. To update the Project Monitoring Committee about the status / progress of implementation including technical issues faced by the users, across University and respective affiliated colleges.
7. Act as a Liaison between the System Integrator and the university users for resolution of any technical issues that may arise from time to time.
8. Facilitate data sharing between university and Maha IT / System Integrator's representative.
9. Conduct periodic reviews with the onsite support team regarding the progress of implementation.
10. Resolve local issues.